# महावितरण

## *महाराष्ट्र राज्य विद्युत् वितरण कंपनी मर्यादित*

## जाहिरात क्र.   ०९ / २०११

***अत्युच्च गुणवत्ता धारक खेळाडूंची आणि अपंग उमेदवारांची विशेष भरती मोहीम***

***विद्युत वितरण क्षेत्रातील अग्रगण्य असणाऱ्या महाराष्ट्र राज्य विद्युत् वितरण कंपनी मर्यादितच्या कार्यालयाच्या कार्यकक्षेत येणाऱ्या कार्यालयातील वेतनगट ३ मधील निम्नस्तर लिपिक / कार्यालयीन सहाय्यक संवर्गातील ८० पदे अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूमधून आणि १२० पदे अपंग उमेदवारांमधून सरळ सेवा भरतीद्वारे भरण्याकरिता विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.***

**अर्हता :**

***अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूकरिता***

**क)** अंतरराष्ट्रीय किंवा राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धामध्ये खालील नमूद केलेल्या खेळात / क्रीडेत राज्य किंवा राष्ट्राचे प्रतिनिधित्व केलेला /केलेली पुरुष/ महिला क्रीडापटू.

**ख)** खाली नमूद केलेल्या खेळांच्या वैयक्तिक अथवा सांधिक क्रीडा स्पर्धामध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू. राज्य अजिक्यपद स्पर्धा या सदर खेळांच्या महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनसी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनने स्वतः आयोजित केलेल्या असाव्यात. किमान प्राविण्यापेक्षा उच्च स्तरावरील क्रीडा प्राविण्य मिळविणाऱ्या उमेदवारास प्राधान्य राहील. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धामध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंचा विचार केला जाणार नाही.

**ग)** राष्ट्रीय छात्रसेनेमध्ये (NCC) अंडर ऑफिसरची रँक मिळवून राष्ट्रीय छात्रसेनेच्या खालील नमूद केलेल्या खेळांच्या राष्ट्रीय स्पर्धामध्ये पदके प्राप्त केलेली व्यक्ती.

**क्रीडा प्रकार :**

(१) आर्चरी, (२)आट्यापाट्या, (३) अॅथलेटिक (ट्रॅक आणि फिल्ड प्रसंगासह), (४) अॅक्वटिक्क, (५) आईस हॉकी, (६) बुध्दीबळ (चेस) (७) बॅडमिंटन, (८) बॉल बॅडमिंटन, (९) बेसबॉल (१०) बास्केटबॉल, (११) बिलियर्ड अॅन्ड स्नुकर, (१२) बॉलिंग, (१३) बॉडी बिल्डर्स, (१४) ब्रिज, (१५) बॉबस्लिप, (१६) विएथलॉन, (१७) ब्लाइंड स्पोर्टस, (१८) बॉक्सिंग, (१९) कराटे, (२०) कॅरम, (२१) क्रिकेट, (२२) कबड्डी, (२३) कुस्ती, (२४) कॅनॉइग अॅण्ड कायकिंग, (२५) खो-खो, (२६) फन्सिंग, (२७) फूटबॉल, (२८) गोल्फ, (२९) हॅन्डबॉल, (३०) हॉकी, (३१) जिम्नॅस्टिक, (३२) ज्युडो, (३३) लग, (३४) लॉन टेनिस, (३५) मल्लखांब, (३६) मोटर स्पोर्टस, (३७) माऊंटनिअरिंग, (३८) रग्बी फूटबॉल, (३९) रोलर स्केटींग, (४०) रायफल, (४१) पोलो, (४२) पॉवरलिफ्टिंग, (४३) पॅरॉलॉपिक, (४४) रोईंग, (४५) स्क्वॅश, (४६) सायकलिंग, (४७) सायकल पोलो, (४८) सेपाक टकरा, (४९) सॉफ्ट टेनिस, (५०) सॉफ्ट बॉल, (५१) स्कूल गेम, (५२) स्केटींग, (५३) शूटींग बॉल, (५४) टेबल टेनिस, (५५) थ्रोबॉल (५६) ट्रॅम्पोलिन, (५७) टंग ऑफ वॉर, (५८) ट्रायथलॉन, (५९) तायक्वांदो, (६०) वेटलिफ्टिंग, (६१) योगा, आणि (६२) व्हॉलबॉल

**खेळाडूंची कामगिरीविषयक प्रमाणपत्रे शासन निर्णय क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ३० एप्रिल, २००५ चे परिशिष्ट - ब येथे दिलेल्या प्राधिकाऱ्याने विहित नमुन्यात घेऊन संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रमाणित केलेली असावीत.**

**अपंग उमेदवाराकरिता :**

**अपंग व्यक्ती (समान संधी, संपुर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम १९८५ मध्ये अपंगत्वाच्या दिलेल्या व्याख्येप्रमाणे (Defination of Disability) संबंधित अपंगत्वाचे प्रमाण ४० टक्क्यापेक्षा कमी नाही असे सक्षम समिती अथवा बोर्डाने प्रमाणित केलेले विहित नमुन्यातील प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.**

**वेतनश्रेणी** : ९०२०-२२०-१०१२०-२९५-१३०७०-३२५-२२४९५

**एकूण अंदाजे पगार** : प्रतिमहा रु. १७६४२/- (घरभाडे भत्ता व्यतिरिक्त)

## शैक्षणिक अर्हता (दिनांक १९ / ११ / २०११ रोजी)

१) मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी आणि

२) उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे ''सी.सी.सी. '' किंवा ''ओ'' स्तर किंवा ''ए'' स्तर किंवा ''बी'' स्तर किंवा ''सी'' स्तर स्तरावरील प्रमाणपत्र **अथवा** ए.आय.सी.टी.ई चे ''संगणक / माहिती तंत्रज्ञान'' या विषयातील पदवीका प्रमाणपत्र **अथवा** एम.एस.सी.आय.टी. प्रमाणपत्र आसणे आवश्यक आहे.

**टिप : उमेदवाराने मान्यता प्राप्त विद्यापीठातील संगणक / माहिती तंत्रज्ञान या विषयातील उच्चस्तर पदवी संपादन केली असल्यास अशा उमेदवारांना अनुक्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.**

## दिनांक १९ / ११ / २०११ रोजी वयोमर्यादा

दिनांक १९ / ११ / २०११ रोजी वयोमर्यादा किमान १८ वर्षे पुर्ण व कमाल वय ३० वर्षे असावे. मागासवर्गीयांसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षे शिथिलक्षम राहील. अपंग उमेदवारांकरिता उच्चत्तम वयोमर्यादा १० वर्षांनी शिथिलक्षम राहील. कंपनीतील (महावितरण मधील) कर्मचाऱ्यांकरिता उच्चत्तम वयोमर्यादेची अट लागु राहणार नाही.

## महत्वाच्या तारखा व वेळापत्रक :

| | | |
|---|---|---|
| अर्ज पाठविण्याची अंतिम तारीख | : | १९ / ११ / २०११ |
| मुंबई येथे लेखी परीक्षा | : | माहे डिसेंबर २०११ / जानेवारी २०१२ |
| मुंबई येथे वैयक्तिक मुलाखत | : | जानेवारी २०१२ / फेब्रुवारी २०१२ |

## सर्वसाधारण अटी :-

१) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग व इतर मागासवर्ग यासाठी आरक्षण अधिनियम, २००१ (सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. ०८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९/०१/२००४ पासून अंमलात आणला आहे. सदर अधिनियमानुसार फक्त अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांना सोडून उर्वरित मागासवर्गातील सर्व जाती प्रवर्गातील म्हणजे वि.जा. (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क), भ.ज. (ड), वि.मा.प्र., इतर मागासवर्ग याना उन्नत/प्रगत गटाचे (क्रिमिलेअर) तत्व लागू केले आहे. त्या प्रवर्गातील उमेदवारांनी जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे दिनांक ०१/०४/२०११ नंतरचे किंवा जाहिरातीच्या दिनांकास वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र धारण केले असले पाहिजे.

२)  अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडुंकरिता नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची अट लागु नाही.

३)  मागास प्रवर्गातील उमेदवारांनी जातीच्या दाखल्याबरोबरच जात पडताळणी समितीने वैध ठरविलेले **"जाती वैधता प्रमाणपत्र"** सादर करणे आवश्यक आहे. शासन परिपत्रक क्र. बीसीसी-२००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब, दिनांक ५ नोव्हेंबर २००९ नुसार जाती वैधता प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच नियुक्ती देण्यात येईल. मात्र संबंधित उमेदवाराने निवडसूची वैधते पर्यंत जाती वैधता प्रमाणपत्र सादर करणे ही सर्वस्वी सदर उमेदवाराची जबाबदारी राहील.

४)  शासकीय / निमशासकीय / महामंडळ तसेच इतर वीज कंपन्यांमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या विभागामार्फत / योग्य अधिकारी वर्गामार्फत अर्ज करावा. **अशा उमेदवारांची निवड झाल्यास त्यांच्या पूर्वीच्या कंपनीच्या / संस्थेच्या सेवेची कोणतीही जबाबदारी घेण्यात येणार नाही.**

५)  महाराष्ट्र सिव्हील (Declaration of Small Family) अधिनियम, २००५ अंतर्गत विहित केलेल्या छोटे कुटुंब व्याख्यांमध्ये मोडणे ही एक आवश्यक पात्रता आहे.

## <u>अर्ज करण्याची पध्दत</u> :

१)  उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्जावर विहित ठिकाणी एक पासपोर्ट साईज फोटो लावावा व अर्ज **पोस्ट बॉक्स नंबर ७७२९, बोरीवली (पश्चिम), मुंबई ४०० ०९२ [Post Box No. 7729, Borivali (West), Mumbai 400 092] येथे दिनांक १९/११/२०११** पर्यंत पोचतील असे साध्या टपालाने पाठवावेत. अर्जाचा नमुना खाली दिला असून उमेदवारांनी सदर नमुन्यातच अर्ज सादर करावा. उमेदवारांनी पाठविलेल्या अर्जाची छायांकित प्रत स्वतः जवळ ठेवावी. **पोस्टाच्या विलंबास कंपनी जबाबदार राहणार नाही.**

२)  अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र, अपंगत्वाचे प्रमाणपत्र तसेच नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट इत्यादी प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. सदर प्रती केंद्र/राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोष्टमास्तर, मुख्याध्यापक व याबाबतीत प्राधिकृत व सक्षम अधिकाऱ्यांनीच साक्षांकित केलेल्या असाव्या. तसे नसल्यास किंवा चुकीची माहिती असल्यास अर्ज अपुर्ण समजून नाकारला जाईल.

३)  अर्जासोबत खेळाडूंची कामगिरी विषयक प्रमाणपत्रे शासन निर्णय क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/ क्रीयुसे-२ दिनांकः ३० एप्रिल, २००५ चे परिशिष्ट - ब येथे दिलेल्या प्राधिकाऱ्याने विहित नमुन्यात घेऊन संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रमाणित केलेली जोडणे आवश्क आहे.

५)  अर्जासोबत अपंग उमेदवारांनी शारिरीकदृष्ट्या किमान ४०% अपंगत्व असल्याचे सक्षम अधिकाऱ्यांनी निर्गमित केलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

६)  शासकीय / निमशासकीय महामंडळ, इतर वीज कंपनीमधील कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने भरावे व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी.

## <u>निवड पध्दती :</u>

१)  अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षेकरिता बोलविलेल्या उमेदवारांची यादी कंपनीच्या संकेत स्थळावर www.mahadiscom.in वर उपलब्ध करुन देण्यात येईल. उमेदवारांना लेखी परीक्षेकरिता स्वतंत्रपणे **अवेदनपत्र** पाठविण्यात येणार नाहीत. उमेदवारांनी कंपनीच्या संकेतस्थळावरुन आवेदन पत्र **डाऊनलोड** करुन घेऊन त्यामध्ये माहिती भरावयाची आहे. लेखी परीक्षा सर्वसाधारणपणे माहे डिसेंबर २०११ / जानेवारी २०१२ मध्ये मुंबई येथे घेण्यात येईल. लेखी परीक्षेकरिता उमेदवारांना स्वखर्चाने यावे लागेल.

२) **लेखी परीक्षेकरिता बोलविलेल्या उमेदवारांची अर्जांची कोणत्याही प्रकारची छाननी करण्यात येणार नाही. त्यामुळे अर्हता धारणकरित असल्याबाबतची खात्री करणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी आहे.**

३) लेखी परीक्षेतील गुणवत्तेच्या आधारे वैयक्तिक मुलाखतीकरिता पात्र उमेदवारांची संक्षिप्त यादी तयार करण्यात येईल व माहे जानेवारी २०१२ मध्ये पात्र उमेदवारांच्या मुंबई येथे वैयक्तिक मुलाखती आयोजित करण्यात येतील. वैयक्तिक मुलाखतीकरिता पात्र उमेदवारांना आवेदनपत्र पाठविण्यात येणार नाहीत. पात्र उमेदवारांचे परीक्षा क्रमांक व वैयक्तिक मुलाखतीचा कार्यक्रम कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. पात्र उमेदवारांनी संकेतस्थळावरुन वैयक्तिक मुलाखतीच्या आवेदनपत्र डाऊन लोड करुन वैयक्तिक मुलाखतीच्या कार्यक्रमाप्रमाणे हजर रहावे.

४) वैयक्तिक मुलाखतीच्या कार्यक्रम संपल्यानंतर कोणत्याही उमेदवाराची कोणत्याही कारणास्तव मुलाखत घेतली जाणार नाही.

५) उमेदवारांची लेखी परीक्षेतील आणि वैयक्तिक मुलाखती मधील गुणवत्तेचे एकत्रीकरण करुन निवडसूची बनविण्यात येईल.

६) **निवड झालेल्या उमेदवारांनी त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, खेळामधील प्राविण्य, शारिरिक बाधित / व्यंगत्वाचे प्रमाण इत्यादी सिद्ध करणे हे उमेदवारांची जबाबदारी राहिल. यापैकी कोणतीही बाब उमेदवार सिद्ध करु न शकल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल.**

७) अत्युच्च गुणवत्ता धारक खेळाडुकरिता आणि अपंगासाठीचे आरक्षण हे समांतर आरक्षण असल्याने या आरक्षणांतर्गत निवड झालेले पात्र उमेदवार हे त्या त्या पदांच्या अनुशेषनिहाय आरक्षणाखाली राखीव जागांवर दर्शविण्यात येईल. जसे की अ.जा., अ.ज., वि.जा. (अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इ.मा.व. अथवा खुला प्रवर्ग.

## इतर अटी :

१) जाहिरातीत दर्शविण्यात आलेली अर्हता ही किमान अर्हता आहे आणि केवळ ही किमान अर्हता हाच निकष मानून उमेदवार संबंधित पदाच्या निवडीसाठी पात्र ठरु शकणार नाही.

२) अर्ज सादर करणे हा नियुक्ती / नेमणुकीचा हक्क होऊ शकत नाही.

३) अर्ज करणाऱ्या प्रत्येक उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. उमेदवार हा महाराष्ट्रातील अधिवासी (Domicile) असला पाहिजे.

४) उमेदवारांनी यापुर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार केंद्र / सेवायोजन कार्यालय / एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय / जिल्हा सैनिक कार्यालय येथे नोंदवले असले तरी त्यांनी या जाहिरातीस अनुसरुन स्वतंत्र अर्ज सादर करणे आवश्यक आहे. नोंदणी क्रमांक अर्जामध्ये नमुद करावा.

५) निवड झालेले उमेदवार कंपनीच्या सेवेत रुजू झाल्यानंतर त्यांना मुळ वेतना व्यतिरिक्त महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व इतर भत्ते इत्यादी कंपनीच्या नियमांप्रमाणे मिळण्यास पात्र ठरतील.

६) भरती प्रक्रिये दरम्यान जर एखाद्या उमेदवारांनी सादर केलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अशा उमेदवाराचा अर्ज भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यात अपात्र ठरविण्यात येईल.

७) जाहिरातीतील पदांची भरती प्रक्रियेबाबतचा कंपनीचा निर्णय अंतिम असून त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार वैयक्तिक पातळीवर कोणाशीही केला जाणार नाही.

८) भरती प्रक्रियेत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्रचार / हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवाराचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

९) निवड केलेल्या उमेदवारास कंपनीच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही कार्यालयाच्या ठिकाणी रिक्त पदाच्या उपलब्धतेनुसार नियुक्त करण्यात येईल, याबाबत कंपनीचा निर्णय अंतिम राहील.

१०) निवड झालेल्या उमेदवाराने नियुक्तीच्या ठिकाणी स्वखर्चाने जाऊन रुजू होणे आवश्यक राहील.

११) जाहिरातीत बदल किंवा जाहिरातीच्या काही भागात अंशतःबदल किंवा संपुर्ण जाहिरात रद्द करण्याचे अधिकार हे कंपनी राखून ठेवीत आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही.

१२) **निवडीच्या कोणत्याही टप्प्याला उमेदवार विहित अर्हता / अनुभव धारण करीत नसल्याचे किंवा त्याचे पूर्वीचे चरित्र गैरवर्तणूकीचे आढळल्यास त्याची उमेदवारी / नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल. तसेच अशा उमेदवाराची नियुक्ती झाल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.**

१३) निवड सूचीची विधी ग्राह्यता (Validity) निवडीच्या तारखेपासून एक वर्षाची राहील. त्यानंतर ही निवड सूची नियमाप्रमाणे व्यपगत होईल.

१४) निवड झालेल्या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडुंनी शासन निर्णय क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ३० एप्रिल, २००५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे संचालक, क्रिडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी, प्रमाणित केलेली खेळातील कामगिरीबाबतची प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. अन्यथा त्यांना नेमणुक पत्र दिले जाणार नाही. परिणामी त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

१५) अर्जामध्ये नमूद केलेल्या बाबी / विवरणेच ग्राह्य धरण्यात येतील. अर्ज सादर केल्यानंतर दिलेली माहिती / विवरणपत्रे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

१६) **करारनामा :** निवड झालेल्या उमेदवारांना कंपनीमध्ये रुजू होण्यापूर्वी किमान ३ वर्षे सेवा करण्याबाबत कंपनीने विहित केलेला करारनामा रुपये १००/- किंमत असलेल्या मुद्रांकपत्रावर (Bond Paper) करुन देणे बंधनकारक राहील.

********

## अपंगासाठी / अत्युच्च गुणवत्ता धारक खेळाडुसाठी विशेष भरती मोहिमे अंतर्गत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितने निम्नस्तर लिपिक / कार्यालयीन सहाय्यक पदासाठी दिलेल्या जाहिरातीस अनुसरुन करावयाच्या अर्जाचा नमुना

**जाहिरात क्र. ०९ / २०११**

| |
|---|
| उमेदवाराने त्याचे अलिकडे काढलेले पारपत्र आकाराचे छायाचित्र लावून त्यावर स्वाक्षरी करावी २.५ से.मी. X ३ से.मी. |

१. उमेदवारांचे संपूर्ण नाव : __________ __________ __________

आडनाव स्वतःचे नाव वडिलांचे / पतीचे नाव

२. उमेदवारांचे इंग्रजीतून संपूर्ण नाव : __________ __________ __________

(Surname) (Name) (Fathers/Husbands Name)

३. पत्रव्यवहाराचा पत्ता : ______________________________

______________________________

______________________________**पिन कोड** __________

मोबाईल नं. : ______________ E-mail ID ______________

४. लिंग : ______________________________

५. जन्म तारीख (एस.एस.सी.प्रमाणपत्राप्रमाणे): ______________________________

दिनांक १९ / ११ / २०११ रोजी वय [ ][ ] वर्षे [ ][ ] महिने [ ][ ] दिवस

६. अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी आहे काय : होय / नाही

७. सेवा योजन कार्यालयाचे नोंदणी पत्र असल्यास त्याचा क्रमांक व दिनांक : ______________________________

८. जातीचा प्रवर्ग : (योग्य ठिकाणी ( ✔ ) अशी खूण करावी)

| अजा S.C. | अ.ज. S.T. | वि.जा.अ. VJ-A | भ.ज.ब. NT-B | भ.ज.क. NT-C | भ.ज.ड NT-D | वि.मा.प्र. SBC | इ.मा.व. OBC | सर्वसाधारण/खुला OPEN |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

९. (अ) **अत्युच्च गुणवत्ता धारक खेळाडूसाठी**

(i) मान्यता प्राप्त क्रीडा प्रकार (योग्य ठिकाणी ( ✔ ) अशी खूण करावी)

[ ] इंडियन ऑलिम्पिक असोसिएसशनद्वारे [ ] महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएसशनद्वारे

[ ] महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएसशद्वारे शिफारस केलेले खेळ [ ] इतर ______________

(ii) क्रीडा प्रकार [ ] क्रिडा प्रकाराचा अनुक्रमांक [ ]

(iii) प्राविण्य मिळविलेला तपशील : (योग्य ठिकाणी ( ✔ ) अशी खूण करावी)

[ ] सुवर्ण / प्रथम [ ] रौप्य / द्वितीय [ ] कास्य / तृतीय

(iv) खेळाडूंची कामगिरीविषयक प्रमाणपत्र शासन निर्णय क्र. राक्रीधो - २००२ / प्र.क्र.६८ / क्रीयुसे-२, दिनांक ३० एप्रिल,२००५ चे परिशिष्ट - ब येथे दिलेल्या प्राधिकाऱ्याने विहित नमुन्यात दिलेले आणि संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रमाणित केलेले सोबत जोडल आहे काय ? : **होय / नाही**

९. (ब) **उमेदवारांच्या अपंगत्वाबाबतची माहिती** :

(i ) अपंगत्वाचे प्रकार (योग्य ठिकाणी ( ✔ ) अशी खूण करावी)

☐ Low Vision (क्षीणदृष्टी) ☐ One leg Affected (एक पाय बाधित)

☐ Partially Deaf (बहिरा) ☐ One Arm (एक हात बाधित)

(ii ) अपंगत्वाची टक्केवारी : ________%

(iii) अपंगत्वाचा दाखला देणाऱ्या प्राधिकाऱ्याचे नांव : ________________________________________

(सक्षम वैद्यकीय समिती / मंडल यांनी प्रमाणित केलेले अपंगत्वाचे साक्षांकित प्रमाणपत्र सोबत जोडावे) **होय / नाही**

१०. शैक्षणिक अर्हता :

| उत्तीर्ण केलेली परीक्षा | विद्यापीठ/मंडळाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | टक्केवारी/श्रेणी |
|---|---|---|---|
| पदवी | | | |
| एम.एस.सी.आय.टी. | | | |

११. अनुभव असल्यास : ________________________________________________________________

१२. आज रोजी मला _______(संख्या) इतकी मुले हयात / आहेत.त्यापैकी दि.२८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या _______इतकी आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा).हयात असलेल्या मुलांची संख्या त्यापेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी अर्हता ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

वर नमूद केलेली सर्व माहिती खरी असून ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे. याबाबत कंपनीचा निर्णय मला बंधनकारक राहिल. या खोट्या माहितीच्या आधारे माझी निवड झाल्यास मला नोकरी देण्यात आल्यास ती रद्द करण्यास / गमविण्यास मी ग्राह्य राहील. याबाबत माझी कोणतीही तक्रार रहाणार नाही.

**ठिकाण :**

**दिनांक :**

**(उमेदवाराची सही)**

- अर्जासोबत खालील (छायांकित ) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.

१) शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र **होय / नाही**

२) एस.एस.सी. झाल्याचे प्रमाणपत्र **होय / नाही**

३) अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) **होय / नाही**

४) जातीचे प्रमाणपत्र **होय / नाही**

५) जाती वैधता प्रमाणपत्र **होय / नाही**

६) संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र **होय / नाही**

७) सक्षम वैद्यकीय समिती / मंडल यांनी प्रमाणित केलेले अपंगत्वाचे साक्षांकित प्रमाणपत्र: **होय / नाही**

८) पदवी प्रमाणपत्र (Degree Certificate) **होय / नाही**

९) एम.एस.सी.आय.टी. प्रमाणपत्र **होय / नाही**

१०) प्रगत / उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र **होय / नाही**

**उमेदवाराचे नाव व सही :**____________________